CMYK

बीड । बुधवार

२६.०२.२०२५

वर्ष : ४ अंक : ३१९

किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# महाराष्ट्र सरकारने कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात 12 टक्के केली वाढ



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या वित्त विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, महागाई भत्त्यात वाढ झाल्याने सुमारे १७ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे. महागाई भत्त्याच्या वितरणाबाबतच्या विद्यमान प्रक्रिया आणि तरतुदी भविष्यातही लागू राहतील, असे सरकारी आदेशात म्हटले आहे. ड्खतए: बसेसमध्ये सुरक्षा मार्शल किंवा पोलिस कर्मचारी तैनात करण्याचा विचार- सरनाईक

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्र सरकारने मंगळवारी १ जुलै २०२४ पासून लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगाच्या अपरिवर्तित वेतनश्रेणी अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) १२ टक्क्यांनी वाढ करण्याचा आदेश जारी केला. सरकारी निर्णयानुसार (GR) ४४३ टक्क्यांवरून ४५५ टक्के करण्यात आलेला सुधारित महागाई भत्ता फ ेब्रुवारी २०२५ च्या पगारासह रोख स्वरूपात दिला जाईल, ज्यामध्ये १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंतच्या थकबाकीचा समावेश आहे. तसेच राज्याच्या वित्त विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, महागाई भत्त्यात वाढ झाल्याने सुमारे १७ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे. महागाई भत्त्याच्या वितरणाबाबतच्या विद्यमान प्रक्रिया आणि तरतुदी भविष्यातही लागू राहतील, असे सरकारी आदेशात म्हटले आहे. तसेच सुधारित महागाई भत्त्यावरील खर्च सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वेतन आणि भत्त्यांच्या संबंधित शीर्षकांतर्गत वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधून भागवला जाईल, असे

आदेशात म्हटले आहे. अनुदान देणाऱ्या संस्था आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा खर्च त्यांच्या आर्थिक मदतीसाठी निर्दिष्ट केलेल्या उप-शीर्षकांतर्गत नोंदवला जाईल.

## अंतराळात अडकलेल्या सुनीता विल्यम्स यांच्या सुटकेचा मार्ग बंद?

### NASA माजी अधिकाऱ्याचा धक्कादायक खुलासा!

**वृत्तसंस्था**

NASA च्या माजी उप प्रशासकाने ब्लूमबर्गला सांगितले की, NASA च्या उच्च अधिकाऱ्यांना योजनेपूर्वी अंतराळात अडकलेल्या दोन अमेरिकन अंतराळवीरांना घरी आणण्यासाठी एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्सकडून कधीही कोणताही प्रस्ताव मिळाला नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या अब्जाधीश समर्थनामुळे माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या व्हाईट हाऊसने त्वरित बचाव मोहीम चालवण्याचा त्यांचा प्रयत्न रोखला गेला होता, या मस्क यांच्या दाव्यांवर टिप्पण्यांमुळे शंका निर्माण झाली आहे. NASA चे प्रशासक बिल नेल्सन यांच्या अंतर्गत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या माजी अंतराळवीर पाम मेलरॉय यांनी एका मुलाखतीत म्हटले, क्रू मेंबर्सना लवकर घरी आणण्याची ऑफर देण्यात आली होती, पण ती कधीच मुख्यालयात



आली नाही.

सांगायचे म्हणजे, अध्यक्ष ट्रम्प यांचे जवळचे सल्लागार मस्क यांनी गेल्या आठवड्यात सोशल मीडिया साइट 'एक्स'वर एका पोस्टमध्ये म्हटले होते की, अधिकाऱ्यांनी योजनेपूर्वी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहणाऱ्या अंतराळवीरांच्या जोडीला घरी आणण्याच्या त्यांच्या प्रस्तावाला स्पष्टपणे नाकारले होते. मस्कने 'एक्स'वरील पोस्टमध्ये लिहिले, स्पेसएक्स अंतराळवीरांना 'महिन्यांपूर्वी परत आणू शकले असते. या पोस्टमध्ये मस्कने एका डॅनिश अंतराळवीराविरुद्ध अपशब्द वापरले, ज्याने म्हटले होते की मस्कने ट्रम्प यांच्यासोबत एका

▶▶ उर्वरित पान २ वर

## मस्साजोग ग्रामस्थांसह धनंजय देशमुखांचा एल्गार

### संतोष देशमुख हत्येला ७७ दिवस पूर्ण, पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्याप्रकरणी आज धनंजय देशमुख यांच्यासह मसाजोग ग्रामस्थ अन्नत्याग आंदोलन करत आहेत. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करावी. आरोपींना शिक्षा देऊन कुटुंबाला न्याय द्यावा या मागणीसाठी ग्रामस्थांनी एल्गार पुकारलाय. मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला ७७ दिवस उलटून गेले आहेत. या प्रकरणात अद्याप कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. सकाळी




१० वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. याप्रकरणी केज पोलिसांनी सुरुवातीला केलेला तपास

▶▶ उर्वरित पान २ वर

## परळीत पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी, ५६४.५८ कोटी निधीची तरतूद

### परळीचे प्रगतीच्या वाटेवर आणखी एक विश्वासात्मक पाऊल : धनंजय मुंडे

**धनंजय मुंडे यांनी मानले मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच पशू संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार**

**परळी । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत परळी विधानसभा मतदारसंघात नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली असून यासाठी ५६४.५८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. याबद्दल परळीचे आमदार तथा अन्न व नागरी पुरवठा



मंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे तसेच पशू संवर्धन मंत्री तथा त्यांच्या भगिनी पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत. परळी मतदारसंघात कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन म हाविद्यालय, सोयाबीन संशोधन व प्रक्रिया केंद्र, सीताफळ इस्टेट इत्यादी शासकीय शिक्षण - प्रशिक्षण संस्था याआधी धनंजय मुंडे ▶▶ उर्वरित पान २ वर

## रस्ते व इमारती उपक्षेत्रातील प्रलंबित देयकांसाठी १५ हजार कोटी रुपयांचा निधी वितरीत

**मुंबई । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व इमारती उपक्षेत्राकरिता प्रलंबित देयके अदा करण्यासाठी सन २०२४-२५ मध्ये आतापर्यंत १५ हजार ९१ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच या तरतुदीपैकी फेब्रुवारी २०२५ मध्ये विविध घटकांसाठी एकूण ६८३ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे देण्यात आली आहे. प्रलंबित देयके अदा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक संपन्न झाली.



*जिल्हा माहिती अधिकारी श्री. प्रशांतजी दैठणकर साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे. दुसऱ्या छायाचित्रात कर्मचारी वृंद दिसत आहेत.*

## नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली

### छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील तुटलेल्या जिमच्या साहित्याची स्वखर्चाने दुरुस्ती : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणांवर सकाळी आणि सायंकाळी व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना नगरपरिषद प्रशासनाने बसवलेले साहित्य मोडकळीस आले होते यामुळे व्यायाम करणारांची हेळसांड होत होती. मोडकळीस आलेल्या जिमच्या साहित्याची



दुरुस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## वेश्या व्यवसायावर AHTU व LCB पथकाचा छापा

**बीड । प्रतिनिधी**

शिवाजी नगर येथे सह्याद्री हॉटेलचे विरुद्ध दिशेचे गल्लीत हॉटेल किनारा जवळ एक इसम मेसचे नावा खाली त्याची पत्नी व एक खाजगी इसम यांचे मदतीने त्याचे राहते घरात महीलांना बोलवुन वैश्या व्यवसाय करत असल्याची माहिती बीडच्या क्ढण पथकाला मिळाली त्यावरून क्ढण पथकाच्या प्रभारी अधिकारी वर्षा व्हगाडे यांनी ही माहीती वरीष्ठांना दिली. मा. पोलीस अधीक्षक यांनी ड्उइ चे पोलीस निरीक्षक संतोष घोडके व क्ढण पथकास आदेश दिल्या-नंतर रेडचे नियोजन करण्यात आले. त्यावरून दोन पंच व क्ढण स्टाफ, डमी ग्राहक हे शिवाजीनगर नगर येथे आले व तेथे डमी ग्राहकाने थुंकून इशारा करताच पथकाने रेड मारली. त्यावेळी तेथून बीड जिल्हयातील

▶▶ उर्वरित पान २ वर




## धारुर शहरातील अतिक्रमणावर फिरविला बुलडोजर

### मेन रोडवरील अतिक्रमण हटवले; धारुर शहराने घेतला मोकळा श्वास

**किल्ले धारुर । प्रतिनिधी**

धारुर शहरातील मेन रोडवरील अतिक्रमण काढण्याला सुरुवात झाली असून अनेक वर्षानंतर रस्ता मोकळा श्वास घेत आहे. अनेक वर्ष पासून अनेकांनी



अतिक्रमण केलेले होते. रस्ता करण्याची मागणी व्यापारी व नागरिकांची होती. रस्ता करण्यासाठी अतिक्रमण काढण्यास आज सुरुवात झाली आहे.मुख्य रस्त्यावरील नालीवर तसेच रस्त्याच्या बाजूना मोकळ्या जागेत अनाधिकृतपणे दुकाने थाटत रस्ता अरुंद करून वाहनांना अडथळा ▶▶ उर्वरित पान २ वर

#### अतिक्रमण न होण्यासाठी ठोस उपाय करा

**शहरातील मेन रोड वरील अतिक्रमण हटविण्याची मोहिम प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मात्र नगरपालिकेचा अतिक्रमण करणार्यावर कसले ही धाक दिसून येत नाही त्यामुळे काही दिवसात हे अतिक्रमणा पुन्हा होणार नाही यासाठी नगर पालिका प्रशासनाकडून ठोस उपाय करावयात मागणी नागरिकातून होत आहे.**



# पाचवे ज्योतिर्लिंग परळीचा प्रभू वैद्यनाथ...

**वैद्यनाथ महाराज की जय ! पार्वती पतिहार असा जय घोष करीत महाशिवरात्रीला भावीक देशभरातून परळी येथील वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी येतात पूर्वी परळीची अनेक जूनी नावे आहेत. ती असी कांतीपुरी, वैजयंतीक्षेत्र व पर्यली हीच आजच्या परळी वैजनाथची प्राचीन नावे वायुच्या संघर्षाने या ज्योतिर्मय स्वरूपाचे बारा भाग होऊन ते खिुरले. तीच आज प्रसिध्द असलेली ज्योर्तिलिंग होय. असा उल्लेख परळी महात्मय या ग्रंथात आहे.**



बीड जिल्ह्यातून बालाघाट डोंगराची एक रांग जाते ती परळी येथून जाते या डोंगराच्या पायथ्याशी वैद्यनाथ प्रभूचे भव्य दिव्य असे हेमाडपंथी मंदिर आहे शिवाचा अवतार असलेला वैद्यनाथ हा चित्ताभुमीत रावणाकरीता प्रकट झाला तोच परळीचा वैद्यनाथ भारतातील बारा ज्योर्तिलिंग पैकी पाचवे ज्योर्तिलिंग परळीचे आहे. समुद्रमंथनाच्या वेळी धन्वंतरी वैद्यराज व अमृत ही रत्ने निद्याली. अमृत पिण्यासाठी राक्षस धावले. तेंव्हा भगवान विष्णूने अमृतासह धन्वंतरीला शंकराच्या पिंडीत गुप्त केले. त्यामुळे या लिंगाला अमृतेश्वर किंवा वैद्यनाथ हे नाव मिळाले. असी कथाही सांगीतली जाते. या शिवपीठाचे वैशिष्टये म्हणजे शंकराचा निवास सहकुटूबीय आहे. येथे येणार्या शिवभक्तांना बाराही ज्योर्तिलिंगाचे दर्शन घडते. काशीपेक्षाही अधिक महत्व या स्थानाला आहे. त्यामुळे परळी करांना काशीला जाण्याची गरज नाही. या मंदिराचा जिर्णोध्दार अहिल्यादेवी होळकर यांनी शालीवाहन शके १७०६ चैत्र शुध्द पंचमी शुक्रवार रोजी केला.

ऐसपैस पायर्या, प्रशस्त आवार व रमणीय परिसर हे या मंदिराचे वैशिष्ट्ये आहेत. तिर्थक्षेत्र विकासाचा निधी मिळाल्या पासून मंदिराचा परिसर प्रशस्त दिसत आहे. मंदिराभोवती हरिहर अमृतकुपी, मार्कडेय ही चिरेबंदी बांधकामे असलेली भव्य तिर्थ आहेत. मंदिर शिखरावर विविध मुर्ती आहेत. त्यात मल्हारराव होळकरांचा अश्वरुढ पुतळाही आहे. मुख्य मंदिराला पाच प्रवेश द्वार आहेत. पुर्वेकडून दरवाजा महाद्वार म्हणून ओळखला जातो. याच महाद्वारावर त्रिकाला चौघड्याची हजेरी असते. या प्रवेशद्वारातून आत आल्यावर सागवानी लाकडाचा उंच असा मंडप आहे. या मंडपाखाली नंदीच्या तीन मुर्ती आहेत. शिवभक्तांना येथे आपल्या हाताने श्री ची पुजा करण्याची मुभा आहे. मंदिराच्या मुख्य गाभार्यात श्री गणेश व मराठमोठ्या वेशात पार्वतीमातेचे दर्शन होते. गुडीपाडवा, श्रावणमास, अधिकमास, पौषमास, कार्तिकमास, मकरसंक्रात, दसरा, दिवाळी या दिवशी विविध धार्मिक उत्वस असतात. महाशिवरात्रीला वार्षिक यात्रा उत्सव असतो. परराज्यातून येणार्या भाविकांसाठी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टतर्फे अनेक ठिकाणी भक्त निवास उभारले आहेत. जेवणाची सोय अन्नछत्राखाली सुरू आहे. या शिवाय शहरात मोठ मोठ्या लॉज आहेत. पिण्याच्या पाण्याची तसेच दर्शन सुलभ व्हावे यासाठी स्त्री/पुरूषांच्या व पासधारकाच्या वेगवेगळया रांगा केल्या आहेत. नगर परिषदेने ही यात्रेसाठी व दुकाने लावण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी जागा स्वच्छ करून दिल्या आहेत. शहर पोलीस स्टेशनने यात्रा करून व भाविकांना त्रास होऊ नये यासाठी ठिकठिकाणी पोलीस चौकी, साध्या ड्रेस मध्ये पोलीस यंत्रना चोरीपासून व स्त्रीयांना त्रास होऊनये म्हणून यंत्रणा सज्ज ठेवली आहे. शहरात अनेक देवालये असून पंचमुखी महादेव संत तुळशीराम मंदिरात आहे. देवस्थान कमेटीने मंदिराच्या परिसरातील टपर्या छोटी मोठी दुकाने उठवावीत जेणे करून यात्रेकरूना त्रास होणार नाही. कारण त्यांची वाहने आलेली असतात. परळीत येण्यासाठी रेल्वे व बसेसच्या अनेक सोयी आहेत.

मा. ना. धनंजयमुंडे यांच्या प्रयत्नाने तिर्थक्षेत्राला शासनाकडून भरपूर निधी मिळाला आहे. या निधीचा योग्य वापर होऊन वैद्यनाथ प्रभू यांचा परिसर, बाहेर गावाहून येणार्या भावीकांची सोय मेरूगिरी पर्वतावर बालकासाठी बागबगीच्या खेळाचे मैदाने तसेच हरिहर तिर्थाच्या पूर्व बाजू स्वच्छ करणे, गजानन महाराजाच्या मंदिरासारखी सोय करावी. मंदिर परिसरात दवाखाना असावा मेडिकल असावे. वैद्यनाथ प्रभूचे दर्शन घेण्यासाठी पूर्वेकडील दरवाजा उघडावा प्रति वैद्यनाथाच्या मंदिराचा जीर्णोध्दार करावा. वृध्द स्त्री/पुरूषांना सोय होईल. वैद्यनाथ प्रभूचे मंदिर जूऩ्या परळीत असल्यामुळे जून्या परळीचा विकास करणे अनेक मंदिरे जून्या परळीतच आहेत. भाविकांना परळीतून इतर ठिकाणी जाण्यासाठी त्या त्या ठिकाणाची माहिती त्यांना मिळण्यासाठी ठिक ठिकांनी बोर्ड असावेत त्यावर माहिती लिहिल्याली असावी अशा सुधारणा करा. भावीकांना असे वाटले पाहिजे की अकरा ज्योर्तिलिंग बघितले परंतू पाचव्या ज्योर्तिलिंगा एवढी सोय कुठेही पाहावयास मिळत नाही असे वाटले पाहिजे.

*हर हर महादेव!! वैद्यनाथ महाराज की जय पार्वती पतिहर !!*

**– अनंत भातांगळे (जेष्ट पत्रकार), परळी वैजनाथ**

## पान 1 वरून पुढे...

### अंतराळात अडकलेल्या...

सामायिक मुलाखतीत खोटे बोलले होते. मेलरॉय म्हणाले की, जर मस्कने या प्रस्तावाबद्दल कोणाशी बोलले असेल, तर ते NASA च्या उच्च अधिकाऱ्यांपैकी कोणीही नव्हते. ते म्हणाले, मला माहीत नाही की त्यांनी कोणाशी बोलले. मेलरॉय म्हणाले, बायडन यांचे कार्यालय NASA च्या निर्णय प्रक्रियेतून अनेकदा दूर राहिले आहे. ते म्हणाले, व्हाईट हाऊसने आम्हाला सुरक्षाविषयक निर्णय घेऊ देण्याबाबत आणि ते छड च्या तज्ज्ञांवर सोडण्याबाबत खूप चांगले होते. सांगायचे म्हणजे, हा वाद दोन अंतराळवीर बॅरी बुच विल्मोर आणि सुनीता सुनी विल्यम्स यांच्याशी संबंधित आहे.

### मस्साजोग ग्रामस्थांसह...

असमाधानकारक असल्याचं धनंजय देशमुख यांनी सांगितलं. अन्नत्याग आंदोलनापूर्वी झालेल्या पोलीस अधीक्षकांसोबत झालेल्या चर्चेत अनपेक्षित बाब उघड झाल्याचं त्यांनी सांगितलं. केज पोलीस एसपींच्या कानावर तपास काय झाला हे घालत नसल्याचं धनंजय देशमुख म्हणाले. पोलिसांनी आरोपींना अभय दिल्याचा आरोप ही धनंजय देशमुख यांनी केला. ग्रामस्थांसह धनंजय देशमुख यांच्या मागण्या: कृष्णा आंधळेला अटक झाली पाहिजे ही प्रमुख मागणी आहे, कृष्णा आंधळ्याच्या समर्थक अजूनही त्याचे स्टेटस ठेवतात, त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. ते प्राणघात हल्ले करत आहेत. त्यामुळे त्यांना अटक झाली पाहिजे, सरकारी वकिलांची नियुक्ती करावी, हे प्रकरण फास्टटॅक न्यायालयात अंडरट्रायल चालायला हवं. पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह : या संपूर्ण प्रकरणात पोलिसांच्या तपासाच्या कार्यशैलीवर पहिल्यापासून संशय व्यक्त करण्यात येत आहे . आधी प्रकरणात काय तपास चालू आहे हे कुटुंबीयांना कळवत नाहीत अशी तक्रार होती .त्यानंतर आरोपींना मदत केल्याचा आरोप करण्यात आला . आज अन्नत्याग आंदोलना दिवशी पोलीस अधीक्षकांची झालेल्या चर्चेदरम्यानही पोलिसांची भूमिका असमाधानकारक असल्याचं धनंजय देशमुख सांगत आहेत .

### परळीत पशुवैद्यक...

यांच्या कृषी मंत्री कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यापाठोपाठ पशुवैद्यक पदवी म हाविद्यालय मंजूर झाल्याने हे प्रगतीच्या वाटेवर आणखी एक विश्वासात्मक पाऊल ठरणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.दरम्यान धनंजय मुंडे हे सध्या बेल्स पाल्सी नामक आजाराने ग्रस्त असून उपचार घेत आहेत. या आजारामुळे वेदना व बोलण्यास त्रास होतो, त्यामुळे ते आजच्या मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित नव्हते.

### नगरपरिषद प्रशासनाची...

प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासकीय ध्वजारोहणा साठी आलेले क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले होते. निवेदन अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नरेंद्र कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत लेखी कळवले होते. मात्र नेहमीप्रमाणेच नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. व्यायाम ासाठी येणाऱ्या नागरिकांची हेळसांड लक्षात घेऊन गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत आणि स्वखर्चाने सगळ्या साहित्यांची दुरुस्ती करून घेतली.त्यामुळे एकंदरीतच निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. गुड मॉर्निंग ग्रुपच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सकाळी आणि सायंकाळी नागरीकांची गर्दी असते. व्यायामाच्या दृष्टीने अनेक नागरिक याठिकाणी येतात. अशा नागरीकांसाठी व्यायाम करण्यासाठी काही वर्षापुर्वी ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले होते. या साहित्याची कित्येक महिन्यांपासून मोडतोड झालेली होती.अनेक साहित्य मोडकळीस आलेले होते. त्यामुळे व्यायामासाठी आलेल्या नागरीकांची हेळसांड होत होती. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या सहका–यांनी नगरपरिषद प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे मोडकळीस आलेल्या साहित्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती.मात्र नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले होते. गुड गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी ही बाब लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने तुटलेल्या जिमच्या साहित्याची वेल्डिंगने दुरुस्ती केली.यासाठी अँड.चंदुभाऊ जटाळ, जयदत्त थोटे,शरद जवळकर, अँड.शिवाजी साळवे,राजुशेठ गोरे, घोगरे , संतोष पवार, दिनेश गुरखुदे, जितेंद्र कासट, आनंद बाहेती, किशोर कागदे,अलीमभाई, सुर्यवंशी, ढाकणे, अंकुश निर्मळ, अशोक सुरवसे, वानखेडे, मुकेश भस्मारे, कोठारी, मिसाळ,बाळु निकम,असत पटेल,राजु दळवी यांनी मोलाचे योगदान दिले.

### वेश्या व्यवसायावर...

तीन व पुणे जिल्हयातील १ महीला अशा चार महीला मिळून आल्या. तसेच आरोपी राजेंद्र प्रभाकर मुळूक वय–५०, त्याची पत्नी ज्योती राजेंद्र मुळुक वय–३५, दोघेही राहणार शिवाजी नगर व खाजगी इसम उमेश सुनिलकुमार पारीख रा. जालना रोड, बीड यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्र्वांबर गोल्डे यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके, क्ढण पथकाच्या झख वर्षा व्हगाडे, महीला अंमलदार शोभा जाधव, अनिता दगडखैर, दिपा सावंत, शालीनी उबाळे, अनिता खरम ारे मनिजा खरमाटे, सविता सोनवणे, पुरूष अंमलदार अशोक शिंदे, संजय सुरवसे सुभाष पवार यांनी केली व संबंधित दोन पुरुष आरोपी व २ महीला आरोपी यांचे विरुद्ध पोलीस ठाणे शिवाजी नगर येथे अनैतिक मानवी प्रतिबंध अधिनियम कायदया अन्वये सरकार तर्फे, झख वर्षा व्हगाडे यांनी फिर्यादी होवुन गुन्हा दाखल केला आहे.

### धारूर शहरातील...

निर्माण करत अनेकांनी सर्रासपणे व्यवसाय थाटले होते. या अनाधिकृत टपरी,पायर्या तसेच दुकाने थाटणा–यांवर कारवाईचा बुलडोजर फिरविण्याच्या कारवाईला सुरुवात आज करण्यात आली. शहरातील अतिक्रमणांवर बुलडोजर फिरविण्याची कारवाई करत शहरांना अतिक्रमण मुक्त श्वास मिळाला आहे यामुळे शहरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त होतांना दिसून येत आहे. धारूर शहरातील मेन रोड हा मोठा रस्ता होता परंतु अतिक्रमणामुळे याची रुंदी अतिशय कमी झालेली होती यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणावर अडथळा येत होता.वारंवार सांगून देखील नगर परिषद याकडे दुर्लक्ष करत होती परंतु आता रस्ता होणार असल्याने नगर पालिकेच्यावतीने आज सकाळ पासून अतिक्रमण हटाव मोहिम राबवण्यात येत असून या मोहिमेच्या माध्यमातून शहरातील मेन रोडचे अतिक्रमण काढण्यात येत आहे.

# गंगावाडी येथील ऐतिहासिक जागृत देवस्थान : श्री.पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान

मराठवाड्यातील बीड– जालना जिल्ह्याच्या सीम ेवरील बिड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील दक्षिणमुखी गोदावरी नदीच्या तीरावर असलेल्या गंगावाडी येथील जागृत देवस्थान श्री पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान आहे. हे संस्थान मराठवाड्यात सर्व परिचित असुन नवसाला पावणारे संस्थान म्हणून देखील ओळखले जाते. या ठिकाणी दरवर्षीच बारा महिने व महाशिवरात्रीला तसेच श्रावण महिन्यात दररोज विशेषतः श्रावण सोमवारी दिवसभर बिड, जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील भाविक भक्तगण मनोभावे दर्शनासाठी व बोललेला नवस फेडण्यासाठी येतात. या श्री.पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान वर भाविकांची पुर्णपणे श्रध्दा आहे. हे नवसाला पावणार जागृत देवस्थान म्हणून सर्वपरिचित असुन संस्थान आज कालचे नसुन पुरातन काळापासून आहे असे जुने जाणते वृद्ध नागरिक सांगतात. या मंदिराचे बांधकाम लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या काळात झालेले होते परंतु ते बांधकाम जिर्ण झाल्याने व मोडकळीस आल्याने गांवातील लोकांनी पाडून नवीन बांधकाम करून जिर्णोद्धार केला आहे. आज मितिला श्री. पंचलिंगेश्वर महादेवाचे शानदार असे भव्य – दिव्य मंदिर, समोरील ऋषीमुनींच्या पुरातन सम ाधी, नंदी असुन गांवात येणाऱ्या भाविकांचे व पाहुण्या रावळ्यांचे लक्ष वेधून घेते. या मंदिर बांकामाने व समोरील सभामंडाने गांवच्या वैभवात आणखीनच घातली आहे. भाविक भक्तांच्या सोयीसाठी सभामंडपाच्या खालील भागत ग्राउंड लेवलला भक्त निवासाची देखील व्यवस्था केलेली आहे. हे मंदिर विकासाचे सर्व काम गांवक–यांच्या भक्त गणाच्या लोकसहभागातून झालेली आहेत. यासाठी संस्थानच्या विकासासाठी श्री. पंचलिंगेश्वर तरूण मंडळ सदैव कार्यरत असते. आज पर्यंत या संस्थानला शासनाचा व लोकप्रतिनिधीचा एक रूपया देखील मिळालेला नाही. या ठिकाणी महाशिवरात्री निमित्त पंचदिनी शिवनाम पंचलिंगेश्वर

किर्तन महोत्सव राबविण्यात येतो. तसेच त्या काळात गांवातील श्री. पंचलिंगेश्वर करून मंडळाच्या वतीने योग शिबिर, रक्तदान शिबीर सह विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन आयोजन आवर्जून केले जाते. या पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान लगत गोदावरी नदी दक्षिणमुखी वाहत आहे. या संस्थानचा इंद्रतिर्थ म्हणून देखील उल्लेख गोदा महात्मे या ग्रंथात असल्याचा दावा गोदावरी परिक्रमा करणारे साधूसंतानी केला आहे. गोदावरी परिक्रा करतांना जांबसमर्थ येथील संत रामदास स्वामी यांनी या संस्थानलाभेट दिल्याचे देखील असल्याची माहिती

गांवातील जुनी जाणती मंडळी सांगतात तलवाडा पंचक्रोशीतील भाविक भक्तगण सणा सुदीला, एकादशीला तसेच सोमवारी गंगेस्नानासाठी गंगावाडीत येतात गंगेस्नान झाल्यानंतर प्रथम श्री. पंचलिंगेश्वर महादेवाचे दर्शन घेतात. या परिसरात निसर्गरम्य वातावरणात असुन समोरील वडाचे झाड सर्वांचे लक्ष वेधून घेते अन् उन्हाळ्यात सावलीसाठी देखील उपयोगी ठरते. याच ठिकाणी तालुक्यातील अनेक गांवातील लोक दशक्रिया विधी करीता येतात त्यामुळे उन्हाळ्यात सावलीसाठी व पावसाळ्यात निवा–यासाठी या संस्थान समोरील सभामंडपाचा व परिसरातील वृक्षाचा आधार घेतात. येथील वातावरण श्रावण महिन्यात थंडगार हिरवेगार असते. गांवकरी मनमोकळेपणाने गप्पा गोष्टी करण्यासाठी या परिसरात येत असतात. जवळच हाकेच्या अंतरावर जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असल्याने पशुपक्ष्यांच्या आवाजासम विद्यार्थीचा किलबिलाट ऐकू येतो. त्यामुळे तेथील वातावरण अधिकच प्रसन्नमय वाटते. महाशिवरात्रील तसेच श्रावण महिन्यात दर्शनासाठी भाविकांची गर्दी देखील मोठ्या प्रमाणात असते.

**– ओमराजे कांबीलकर**
**गंगावाडी, ता.गेवराई, जि.बीड**

## पान ४ वरून पुढे...

### महाराष्ट्र राज्य पत्रकार...

बैठकीमध्ये या कार्यक्षेत्रासाठी बीड जिल्हा ग्रामीण यांच्या निवडी सर्वानुमते खेळीमेळीच्या वातावरणात जाहीर करण्यात आल्या.या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संघटनेच्या वाढीसाठी चर्चा,विचार– विनिमय करून आगामी काळात संघटनेचे ध्येय–धोरणे ठरविण्यात आले. यावेळी माजलगाव येथील पत्रकार सुदर्शन स्वामी, सुहास बोराडे, सय्यद आखिल, अँड.मस्के, सतिष राव मुजमुले, शंकर झाडे, शंकर जाधव,शेख एजाज, अर्जुन मुंडे, विष्णु डोईफोडे यासह माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे पदाधिकारी, सदस्य,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. नुतन निवड झालेल्या बीड जिल्हा पदाधिकारी यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले आहे.

### स्थानिक गुन्हे शाखा...

सदरची कामगिरी मा. श्री.नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, मा श्री सचिन पांडकर यांचे मार्गदर्शन खाली पो नी संतोष घोडके ,पोनी उस्मान शेख ,सपोनी विजयसिंह जोनवाल, पो उप नि महेश विघ्ने,,पो.हवा.म हेश जोगदंड,तुषार गायकवाड, राजू पठाण/ ,चापोह गणेश मराडे/,पोशी बाप्पासाहेब घोडके यांनी मिळून केली आहे.

### महाशिवरात्री निमित्त...

मंदिरामध्ये महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांची रीघ लागते.महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच मध्यरात्री याठिकाणी महादेवाला महाभिषेक घालण्यात येणार असून आ.सुरेश धस यांच्या हस्ते हा महाभिषेक केला जाणार आहे.बुधवारी पहाटे ४ ते ७ यावेळेत सार्वजनिक अभिषेक पार पडल्यानंतर सकाळी ७ वाजल्यापासून मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे.दिवसभर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.शिवाय या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर यात्रा देखील या दिवशीच भरते.सायंकाळी ७ वाजता म हाआरती संपन्न झाल्यानंतर मंदिरावर आकर्षक फटाक्यांची आतषबाजी केली जाणार आहे.गुरुवार दि. २७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्वर महादेवाच्या प्रतिम ेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार असून या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### बीडच्या नवीन...

थकबाकी आहे. आणि पहिलीच थकबाकी असल्याने नवीन योजनेला नव्याने वीज कनेक्शन महावितरण विभागाकडून दिले जात नव्हते. त्यामुळे आवश्यक्तेपेक्षा अतिशय कमी क्षमता असलेल्या जुन्या पाणीपुरवठा योजनेतूनच बीड शहराला अनियमित पाणीपुरवठा सद्यस्थितीत केला जात आहे. परिणामी, बीड शहराचे पाणीस्त्रोत असलेल्या माजलगाव बॅकवॉटर आणि बिंदुसरा धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना देखील बीड शहरात २०–२० दिवसातून एकदा पाणी मिळत आहे.

यावर आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी शहरातील नागरिकांचे पाण्यावाचून होणारे हाल पाहता शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरू केला. आ.संदीप क्षीरसागर यांनी तर जवळपास प्रत्येक च अधिवेशनात, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हा प्रश्न मांडला. शासनस्तरावर पाठपुरावा करून अनेकवेळा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मागणी लावून धरली, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे अनेकवेळा बैठका घेतल्या. शेवटी काही तोडगा निघत नसल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याबाबत जनहित याचिका क्र.२१/२०२४ दाखल केली. त्यानंतर ना.अजित दादा पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यापासून दोनवेळा यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी ना.अजितदादांची भेट घेऊन याबाबत त्यांच्याकडे न्याय मागितला. त्यावर ना.अजितदादांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंदर्भात तोडगा काढण्याचे तातडीने निर्देश दिले होते. त्यानुसार याविषयी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व संबंधित विभागांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडून, नगरपालिकेकडे असलेलली थकित वीजबिलाची एकूण रक्कम ४१ कोटी ७५ लाख रुपयांचे ३० टक्के म्हणजेच १२ कोटी रूपये अगोदर भरून वीज कनेक्शन जोडावे व उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने भरण्यात यावी, याकरिता जिल्हा नियोजन विकास निधीतून तरतूद करावी असे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्याम ुळे आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या पाठपुरावा आणि निरंतर केलेल्या प्रयत्नांतून बीड शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटणार आहे.

### भारतीय संविधानाची ....

घराघरा पर्यंत जावीत तसेच प्रत्येक कुटुंबातील शालेय विद्यार्थी महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनी वंचित उपेक्षित समाजातील प्रत्येक घटकापर्यंत भारतीय संविधान पोहोचावे या माध्यमातून एक लहानसा प्रयत्न म्हणून लग्नामध्ये पारंपारिक साडी व इतर भेटवस्तू पाहुणे नातेवाईक मित्रपरिवार यांना आपण देत असतो ,यालाच पर्याय म्हणून लग्नामध्ये भारतीय संविधानाची २०० प्रत नातेवाईक मि त्रपरिवार व महिला यांना देण्याचा या विवाह सोहळ्या मधून छोटासा प्रयत्न केलेल केलेला आहे, त्याचबरोबर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रामध्ये लाडकी बहीण योजना तसेच आनंदाचा शिधा पत्रिका धारक बहिणींना साड्यांची भेट असे वेगवेगळे सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबवलेले दिसतात ,यामध्ये सरकारला एक छोटीशी विनंती म्हणून प्रत्येक कुटुंबापर्यंत भारतीय संविधानाची प्रत देण्याची विनंती पर मागणी करण्यात आली आहे ही भारतीय संविधानाची प्रत शिधापत्रिकाधारक किंवा इतर घटकाच्या माध्यमातून सरकारने प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवावी अशी विनंती पर मागणी वधू चे चुलते ज्ञानेश्वर गवळी यांच्या कडून करण्यात आली. या कार्यक्रमात उपस्थित सर्व परिसरातील नातेवाईक मित्रपरिवार प्रभाळे, नेमाटे, मुळे, गिरगुने, सुरवसे परिवारांची मोलाची साथ लाभल्याने हा अनोखा विवाह सोहळा संपन्न करण्यात आला यासाठी सर्व सन्माननीय मि त्रपरिवार नातेवाईक यांचे आभार देखील मानण्यात आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नाट्यगृहाचे ऑडिट करा ; नगरपरिषद प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे बीडची बदनामी

## नाट्यगृहाच्या दुरूस्ती साठी नाट्यगृहासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराचे वैभव असणारे यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या भाड्यापोटी १५ वर्षात मिळालेल्या लक्षावधी रूपयांपैकी पालिकेने नाट्यगृहाच्या दुरूस्तीसाठी किती निधी खर्च केला , नाट्यगृहासाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असुन नाटयगृहाचे ऑडिट करण्यात यावे. नाट्यगृहाची दुरावस्था असुन फुटलेल्या काचा, तुटक्या खुर्च्या,मोडलेले स्टेज,फाटलेले पडदे,बंद वातानुकूलित यंत्रणा, अचानक बंद पडणारी ध्वनीक्षेपक यंत्रणा, तुटलेले सोफे,घाणेरडे स्वच्छतागृहे याबरोबरच



नाट्यगृहाच्या आवारात झाडाभोवती झालेली पडझड, तुंबलेल्या नाल्या व पसरलेले घाणीचे साम्राज्य आणि सुविधांचा अभाव याकडे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांचे दूर्लक्ष आणि स्थानिक कलाकारांना नाट्यगृहाचे अवाजवी भाडे ,नगरपरिषद प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे नाट्यगृहातील असुविधांमुळे बाहेर जिल्ह्यातील



कलाकारांकडून जाहिर नाराजी व्यक्त करण्यात येत असुन त्यामुळे बीड जिल्ह्याची बदनामी होत आहे यांच्या निषेधार्थ व नाट्यगृहाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ सोमवार रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आवारात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन मुख्याधिकारी नगरपरीषद बीड नीता अंधारे यांच्या मार्फत सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार,पालकमंत्री बीड अजितदादा पवार, नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे तसेच ज्येष्ठ नाट्यकर्मी डॉ .सतिश साळुंखे, प्रा.प्रतिक कांबळे,प्रा.प्रविण निसर्गंध,प्रा.अक्षय कोकाटे,प्रा.दिपक कोरडे आदिंनी आंदोलन स्थळी भेट देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या.

# राज्यातील शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेचे सातशे सोळा कोटी रुपये थकले

## योजना निवडणुकीपूरती होती का ? : ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या वेळेच्या सरकारने निवडणुकीच्या तोंडावर अनेक योजना राबविल्या. आता त्या योजना बंद होत आहेत. लाभार्थी कमी होत आहेत. अशीच शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेची कथा झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये राज्यात मागेल त्याला ठिबक सिंचन योजना राबविण्यात आली. निवडणुकीनंतर आता सातशे सोळा कोटी रुपयांचा निधी थकलेला असतानाही शेतकऱ्यांना दिला जात नाही. त्यामुळे ही योजना निवडणुकी पूरती होती का ? असा आरोप जन आंदोलनाचे ॲड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे.

शेतकऱ्यांना अनुदानावर ठिबक सिंचन पुरविण्यात येते. जवळपास एक लाख तीस हजारावर शेतकऱ्यांना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात या योजनेचे लाभार्थी ठरविण्यात आले होते. केंद्र सरकारने या योजनेसाठी तीनशे कोटी रुपयांची अनुदान दिला देखील. मात्र नियोजनाप्रमाणे सरकारने ही योजना राबवली नाही आणि कृषी खाते यात सपशेल फेल ठरले. ज्या शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेतला, त्या एक लाख तीस हजार शेतकऱ्यांना आता ७१६ कोटी रुपयांचा निधी देणे आवश्यक आहे. मात्र ठिबक सिंचन योजनेतील हे अनुदान आज देखील दिले जात नाही. सरकारकडे पैसेच नसल्याचे कृषिमंत्री खात्याचे म्हणणे आहे. असे असेल तर त्या वेळेचे कृषी मंत्री आणि कृषी खात्याचे सचिव यांनी ही योजना निवडणुकीपूर्वी राबवली का ? हा प्रश्नही उपस्थित होत आहे. मोठ्या प्रमाणात ओरड झाल्यानंतर आता सरकारने जानेवारी २०२५ मध्ये दोनशे कोटी रुपये तर फेब्रुवारी महिन्यात १५३ कोटी रुपयांचा निधी कृषी खात्याला वर्ग केला आहे. मात्र या निधीने शेतकऱ्यांचे देणे पूर्ण होत नाही. त्यामुळे नियोजन शून्य कारभार आणि निवडणुका डोळ्यापुढे ठेवून वाटलेली खैरात, अशीच ही योजना ठरल्याचा आरोपही देशमुख यांनी केला आहे. तर दुसरीकडे गांभीर्याने विचार केला तर राज्य शासनाच्या कृषी खात्याच्या धोरणात सातत्य नसल्यामुळे सिंचन व्यवस्था कोलमडली आहे. फळ पिकांची सिंचन व्यवस्था देखील भ्रष्टाचारात बुडालेली आहे. एकूणच कृषी खात्यावर सरकारचे नियंत्रण नसल्याने लाभार्थ्यांमध्ये देखील दलाल घुसले असून दलालांनी देखील अनेकांना लुटल्याचे समोर येत आहे. सरकारने आता या योजनेची चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी, असेही ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

# उन्हाळ्याची सुरुवात होताच थंड पाणी देणारा गरिबांचा फ्रीज बाजारात

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

उन्हाळ्याची सुरुवात होताच थंड पाण्यासाठी गरिबांचे फ्रीज म्हणून ओळखल्या जाणार्या मातीच्या माठाला सर्वाधिक मागणी वाढली असून ठिकठिकाणी नव्या आकारात विविध रंगाढंगात बाजारात उपलब्ध झाले आहेत. संपुर्ण बीड जिल्ह्यासह धारुर तालुक्यात थांडी कमी होऊन आठ दिवसापासुन कडक उन्हाळा सुरु झाला आहे. उकाडा वाढताच प्रत्येकाला उकाड्यापासून सुटका पाहिजे असते. शितपेयाबरोबरच थंड पाण्याची गरज असते. उन्हाळ्यात तहान भागवण्यासाठी गावातील काही कुटूंब फ्रीज, पाण्याचा वापर करतात. तर गोरगरीब व ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंब,



सर्वसामान्य नागरिकांचा कल हा माठाच्या पाण्याकडे असतो. धारुर येथील आठवडी बाजारासह गावा गावातील विविध भागात आकर्षक असे मातीचे माठ विविध रंगात विक्रीस दाखल झाले आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी उन्हाळ्याच्या दिवसात घरी, शेतात थंड पाण्याचा आनंद घेण्यासाठी बहुतेक शेतकरी, मजुर हे मातीच्या माठाचा वापर आज ही करताना दिसत आहेत. कुंभार बांधव हे मातीपासून बनवलेले छोटे मोठे माठ हे शंभर ते दोनशे रुपयांच्या आसपास विक्री करत असायचे पण कालांतराने यात अमुलाग्र बदल झाला. तोटी असलेल्या माठाची मागणी आहे. स्थानिक व परराज्यातील व्यावसायिकांनी गावोगावी विविध ठिकाणी आकर्षक असलेल्या माठांचे स्टॉल विक्रीसाठी बाजारात लावले आहेत.

## रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) दिव्यांग आघाडी बीड जिल्हाध्यपदी शाहू डोळस यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) माध्यमातुन बीड जिल्ह्यात गेल्या तिस वर्षापासून बीड जिल्ह्यात निराधार, अत्याचारीत, पीडीत दिव्यांग महिला तसेच चळवळी मध्ये कार्यरत राहुन आनेक आंदोलने करून दिन दलीत महीला तसेच दिव्यांग बांधवांना न्याय मिळवुन देण्याची धडपड पाहून त्यांनी केलेले सामाजीक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व चळवळीत कार्यरत आसतांना दिन दलीत, निराधार, शोषीत पिडीतांना न्याय देण्यासाठी गेल्या तिस वर्षापासूनचा अविरत संघर्ष याची



दखल घेवुन रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजीक न्याय राज्य मंत्री मा. ना. रामदासजी आठवले साहेबांच्या आदेशावरून युवक रिपाई महाराष्ट्र अध्यक्ष पप्पुजी कागदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लीकन पार्टीच्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मा. सुरेशजी माने पाटील यांनी शाहू नारायण डोळस रा. चऱ्हाटा, ता.जि.बीड यांची बीड जिल्हा रिपब्लीकन पक्षाच्या दिव्यांग आघाडीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड केली.

या निवडीचे नियुक्तीपत्र रिपब्लीकन पक्षाच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयामध्ये युवक रिपाई महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. पप्पुजी कागदे साहेब, रिपब्लीकन पक्षाच्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मा. सुरेशजी माने पाटील यांच्या हस्ते शाहूराव डोळस यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

# शिवजयंती निमित्त शिवसंग्रामच्या वतीने आयोजित छावा चित्रपटाला प्रचंड गर्दी

### विद्यार्थी, महिला, तरुण आणि शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी
### दिव्यांग विद्यार्थी, निराधार महिला, ऊसतोड मजुरांच्या मुलांनी घेतला चित्रपटाचा आनंद

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवसंग्राम च्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांची यशोगाथा आणि जीवनपट जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्या करिता दिव्यांग विद्यार्थी ,महिला, ऊसतोड मजुरांची मुले, निराधार महिला आणि शिवसंग्राम पदाधिकाऱ्यांसाठी छावा चित्रपटच्या मोफत शोचे आयोजन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या वतीने



दि. २५ रोजी दुपारी बीड येथील तनिष्क सिनेमा येथे करण्यात आले होते. हा चित्रपट मोफत पाहण्यासाठी प्रचंड गर्दी करण्यात आली होती. या प्रसंगी प्रभाकर कोलंगडे, नारायणराव काशीद, सुभाष जाधव, अनिल घुमरे, सुहास पाटील, पंडित माने, बाळासाहेब हावळे, गोपीनाथ घुमरे ,सचिन काळकुटे आदी. उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित छावा चित्रपट जास्तीत जास्त लोकांनी पहावा आणि संभाजी महाराजांचा जीवनपट सर्वांना अनुभवता यावा या करिता या शोची आयोजन काण्यात आले होते.

**चित्रपट पाहण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याबद्दल चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी डॉ. ज्योती मेटे यांचे आभार मानले त्याचबरोबर ऊसतोड मजुरांच्या मुलांनी आणि महिलांनी देखील डॉ.ज्योती मेटे यांचा सत्कार करत आभार मानले.**

## गृहनिर्माण संस्थांवर अववसायक नियुक्ती पॅनल बाबत

**बीड । प्रतिनिधी**

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग यांचेकडुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ/ ७८/ ७८ अ अन्वये गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणा-या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे पॅनेल तयार करण्यासाठी अर्ज शासनातील राज्य शासनाचे गट अ व ब प्रवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी / मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. अँड ए)/ उच्चतम सहकार पदविका (एच.डी.सी.) धारक / चाटर्ड अकाउंटंट (सी.ए.) पदवीधारक यांचेकडुन मागविण्यात येत आहे.

## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्रात बाल आनंद मेळा उत्साहात संपन्न

### बाल आनंद मेळ्यात विद्यार्थ्यांनी केली लाखोंची उलाढाल

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्रामध्ये बाल चिमुकल्यांचे व्यवहारिक ज्ञान वाढवण्यासाठी आज विद्यालयातील शिशुगट, बालवाडी व पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाची सुरुवात प्रथमता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गणपतीच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील पालकांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी विद्यालयातील विद्यार्थी व पालन यांनी बाल आनंद मेळाव्याचा आस्वाद घेत खरेदी विक्री केली. यातून लाखोंची उलाढाल या मेळाव्यामध्ये झाली. या मेळाव्यातून विद्यार्थ्यांनी व्यवहार कसे करायचे याचे ज्ञान अवगत झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पालक बाबासाहेब मुंडे, गणेश करपे, महादेव वाव्हळ, बालासाहेब सोळंके, तपसे मॅडम, भारस्कर मॅडम उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यालयातील शिक्षक श्री. अशोक अंडील सर यांनी केले. यावेळी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## धारुर प्रीमियर लीग मध्ये क्षत्रिय संघ अव्वल तर एस आर कंट्रक्शन व्दितीय

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

किल्ले धारूर शहरात मागील १२ वर्षांपासून धारूर प्रीमियम लीगचे आयोजन केले जाते. या स्पर्धेमुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ मिळत असून यंदाही 'डीपीएल'चे आयोजन करण्यात आले होते धारूर तालुका उत्कृष्ट खेळ करत येथील क्षत्रिय संघने विजेतेपदक पटकावले.

शहरात जय हिंद क्रिकेट क्लबच्या माध्यमातून गत १२ वर्षांपासून धारूर प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते. चिरका मैदानावर या स्पर्धेचे आयोजक करण्यात आले होते या स्पर्धेचा अतिंम सामना आज रविवार रोजी खेळवण्यात आला यामध्ये प्रथम पारितोषिक क्षत्रिय संघाने पटकावले तर व्दितीय एस आर कंट्रक्शन या टीमने पटकावले. या स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.



स्पर्धेचे बक्षीस वितरण शाम सिसरट,नितीन शिनगारे,आक्रम जरगर,पत्रकार अतुल शिनगारे,डॉं. नवनाथ चव्हाण,शुक्ला सर,राजेश सोनवण,रोहित हजारी,संतोष सद्दिवाल,मोहन भोसले,रोमेश तिवारी व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.


## जाहीर प्रगटन

### मा. श्री. ए. एम. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २३५/२०२५, आश्रुबा शामराव गायवळ वि. निरंक**

ज्यापेक्षा **चंपाबाई भ्र. आश्रुबा गायवळ**, हे दिनांक ०८/११/२०२४ रोजी बोरी पो. परभणी (के), ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार- १. आश्रुबा पि. शामराव गायवळ, वय-७८ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपूर/पी, परभणी (क) ता. जि.बीड.२ . सुप्रीया भ्र. अमोल गायवळ, वय-३८ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपुर) पो. परभणी (के) ता.जि. बीड. ३ .प्रांजल पि. अमोल गायवळ, वय-१६ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपूर)पो. परभणी (के), ता.जि. बीड. ४ .अभिनव पि. अमोल गायवळ, वय-१६ वर्षे, रा. बोरदेवी (नवाबपूर)पो. परभणी (के), ता.जि. बीड.

अर्जदार १ हे मयत नामे **चंपाबाई भ्र. आश्रुबा गायवळ,** याचे पत्ती असून, अर्जदार क. २ ही मयताची सुन व अर्जदार क. २ ही नात असुन अर्जदार क. ४ हा मयताचा नातु आहे. तसेच मयताचा मुलगा अमोल पि. आश्रुबा गायवळ हा दिनांक ३०.०८.२०११ रोजी मयत झालेला आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच त्यांना/ अर्जदारांना सदरहू पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, **चंपाबाई भ्र. आश्रुबा गायवळ,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख** ०४/०४/२०२५ आहे. आज दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले. **(अँड असे ए. जी. यांच्यामार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

# प्रभू वैद्यनाथ सर्वांचं भलं करोत

## महाशिवरात्री निमित्त परळीत येणाऱ्या सर्व भाविकांचे स्वागत : धनंजय मुंडे

### महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त धनंजय मुंडे यांनी दिल्या शुभेच्छा

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

परळी स्थित प्रभु वैद्यनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असून, शिवपुराणात वैद्य नाथ या अर्थाने या पाचव्या ज्योतिर्लिंगास अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाशिवरात्रीचे पवित्र पर्व हे सर्व शिवभक्तांच्या आयुष्यामध्ये उत्तम आयुरारोग्य व समृद्धी घेऊन येवो, प्रभू वैद्यनाथ सर्वांचं भलं करो, अशी प्रार्थना राज्याचे अन्न नागरी पुरवठा व



ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी केली आहे.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने





दरवर्षी लाखो भाविक देशभरातून परळी नगरीत दाखल होऊन दर्शन घेत असतात. याही वर्षी लाखो भाविक परळी नगरीत दाखल होताना दिसत असून धनंजय मुंडे यांनी सर्व शिवभक्तांचे प्रभुवैद्यनाथांच्या परळी नगरीत स्वागत करत असल्याचे म्हटले आहे.

महाशिवरात्री महोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने फराळ व फळे वाटपासह यात्रा महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी नात प्रतिष्ठानच्यावतीने यात्रा महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याचाही लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले आहे.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विविध सुविधा, पार्किंग, वाहतूक, स्वच्छ पिण्याचे पाणी यांसह विविध सुविधांच्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांनी नगर परिषद, तहसील व पोलीस प्रशासनास योग्य सूचना देखील केल्या आहेत.



*युवाविजय महाराष्ट्र दौऱ्यानिमित्त दुसऱ्या टप्प्यात मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील परभणी विधानसभेत युवासेना पदाधिकारी यांची बैठक पार पडली. यावेळी मराठवाडा अध्यक्ष विपुल पिंगळे यांनी झालेल्या बैठकीत संघटनात्मक बांधणीबाबत पदाधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नवीन पदाधिकारी यांच्या नियुक्ती करण्यात आल्या त्याचबरोबर उबाठा गटाच्या युवासेना युवती अधिकारी ॲड प्रिती घुले पाटील यांनी युवासेनेमधे प्रवेश केला यावेळी मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, मराठवाडा बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर,शिवसेना सहसंपर्कप्रमुख भास्कर आण्णा लंगोटे, शिवसेना माजी जिल्हा प्रमुख राजु कापसे, युवासेना जिल्हा अध्यक्ष आप्पाराव वावरे, युवासेना जिल्हा अध्यक्ष दिपक टेंगसे,महिला आघाडी जिल्हा प्रमुख गिताताई सुर्यवंशी,शिवसेना उपजिल्हाप्रमुख होंगे पाटील,शिवसेना विधानसभाप्रमुख बाळासाहेब पानपट्टे, शिवसेना शहरप्रमुख नरेश ठाकुर आदी शिवसेना व युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.*

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.विनायक जाधव तर उपाध्यक्षपदी प्रकाश काशिद

**दिंद्रुड । प्रतिनिधी**





महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्ह्याच्या ग्रामीण बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड. विनायकराव जाधव यांची तर उपाध्यक्षपदी दिंद्रुड येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाशराव काशिद यांची निवड करण्यात आली आहे. सोमेश्वर सोनटक्के, बालासाहेब फपाळ , किसनराव भदरगे यांचीही निवड जाहीर करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजयजी भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार तर सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली १८ फेब्रुवारी रोजी तेलगाव येथे सायंकाळी ४ वाजता माजलगाव, धारूर, वडवणी कार्यक्षेत्रातील पत्रकारांची निवडी संदर्भात व्यापक बैठक झाली. या

▶▶ उर्वरित पान २ वर

## स्थानिक गुन्हे शाखा बीड ने नवगण राजुरी मधे चार लाखाचा गुटखा व पानमसाला मुद्देमाल पकडला

**बीड । प्रतिनिधी**

सपोनी विजयसिंह जोनवाल, पो उप नि महेश विघ्ने,,पो. हवा.महेश जोगदंड,पोहावा. तुषार गायकवाड, पो हवा पठाण , बप्पासाहेब घोडके व चापोहवा गणेश मारडे असे पो. स्टे बीड ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पो ह महेश जोगदंड एल सी बी बीड यांना गोपनीय माहिती मिळाली ही इसम नामे राहुल केरबा टुले रा.नवगण राजुरी याने त्याचे राहते नवीन बांधलेल्या घरात मोठ्या



प्रमाणात गुटखा साठवून ठेवला आहे. या खातरीशीर माहिती वरून रेड पार्टी सह जाऊन रेड केली असता त्याचे कडून १) ११ गोण्या इगल ७१७ तंबाखू २) २३ गोण्या हिरा पानमसाला असा एकूण ४,०८,८४० रू चा मुद्देमाल मिळून आला आहे. नमूद आरोपी हा पोलिस ठाणे बीड ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.त्याचे विरुद्ध सरकार तर्फे फिर्याद देऊन गुन्हा दाखल करणे चालू आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## द्वारकाधीश मित्र मंडळाचा मदतीचा हात

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील धोंडीपुरा भागातील ब्राह्मण समाजातील भिक्षुकी करणारे स्व.भालचंद्र कुलकर्णी यांचे काही दिवसांपुर्वी दुःखद निधन झाले होते, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती त्यांच्या हलाखीची असल्याने या कुटुंबासाठी द्वारकाधीश मित्र मंडळाने मदतीचा हात दिला आहे. स्व.भालचंद्र कुलकर्णी यांचा दहाव्या पासुन ते चौदाव्या पर्यतच्या विधीचा सर्व खर्च व्दारकाधीश मित्र मंडळ करणार आहे. द्वारकाधीश



मित्र मंडळाने केलेल्या या मदतीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे. भविष्यात ही या कुटंबाच्या मदतीसाठी द्वारकाधीश मित्र मंडळ कटिबद्ध राहील, असे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## महाशिवरात्री निमित्त पिंपळेश्वर देवस्थानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

### आ.सुरेश धस यांच्या हस्ते आज रात्री महाभिषेक

**आष्टी । प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून. आज मध्यरात्री देवस्थानाच्या वतीने आ.सुरेश धस यांच्या हस्ते महाभिषेक केला जाणार असल्याची माहिती देवस्थान समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून महाशिवरात्री निमित्त शहरातील पिंपळेश्वर

▶▶ उर्वरित पान २ वर

## कोरोना काळात रुग्णवाहीकेची सेवा देणाऱ्या वाहनधारकाचे थकीत बीले तात्काळ अदा करावीत नसता शिवसेना स्टाईलने आंदोलन : शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये प्रशासनाने कोव्हीड-१९ काळामध्ये जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने वापरलेल्या खाजगी रूगनवाहिका व खाजगी वाहन यांच्या गाड्यांची मा. जिल्हा आरोग्य अधिकारी साहेब यांच्या कार्यालयाकडून बिले सण २०२० पासून थकीत आहेत.थकित बीले मिळावित यासाठी रुग्णवाहिका मालकांनी अनेक वेळा बीड जिल्हा संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला,उपोषणे सुद्धा



केली परंतु बिलाची थकीत रक्कम त्यांना मिळाली नाही. यामुळे त्यांच्यातील काही रुग्णवाहिका मालकांनी आज शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांची भेट घेतली व हा सर्व प्रकार त्यांना कळवळा असता शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी तात्काळ लगेचच बीड जिल्हा निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी सर यांची भेट घेऊन वाहन मालकांचे सर्व थकीत बिले लवकरात लवकर अदा करण्यात यावेत असे निवेदन दिले. व सर्व बिले लवकरात लवकर जमा न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी दिला. यावेळी सोबत निकेश जगदाळे, सुभाष यादव, रमेश सुडे, कैलास धुमाळ, महेश मोरे, परमेश्वर बिल्पे, परमेश्वर मोरे, अशोक गिराम, दत्ता ढोंगे, अंगद कोथिंबीरे, राजेंद्र मोरे, अंबादास मोरे, मिठू नागरगोजे, हनुमंत नागरगोजे, पोपट वक्ते, बाळासाहेब वनवे सह सर्व उपस्थित होते.

# बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज कनेक्शन देण्याचा मार्ग मोकळा

### अखेर आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश ; ना.अजितदादा पवारांचे मानले आ.क्षीरसागरांनी आभार

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासाठी जिव्हाळ्याचा असलेला पाणी प्रश्न आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांचा सर्व स्तरांवर अनेक वर्षांपासून सुरू असलेला अखंडित पाठपुरावा आणि अथक परिश्रम यांना अखेर आता यश आले आहे. ना.अजितदादा पवार यांच्याकडे याबाबत आ.संदीप क्षीरसागरांनी न्याय मागितला आणि तो ना.अजितदादांनी दिला. बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी आणि थकीत वीजबील भरण करण्यासाठी जिल्हा





नियोजन विकास निधीतून तरतूद करा. असे निर्देश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांनी जिल्हाधिकारी व बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिले आहेत.

बीडला सध्या कार्यरत असलेली पाणीपुरवठा योजना खूप जुनी आहे. त्यावर बीड शहराचा वाढलेला विस्तार आणि लोकसंख्या यांमुळे या सध्या कार्यरत असलेल्या योजनेतून होणारा पाणीपुरवठा हा बीड शहराच्या आवश्यकतेपेक्षा अतिशय कमी आणि अपूरा होत आहे. परंतु त्यामध्ये महत्वाची गोष्ट अशी की सध्याच्या आणि भविष्यातील बीड शहराच्या पाण्याच्या आवश्यक त्या क्षमतेची 'अटल अमृत पाणीपुरवठा योजना' संपूर्ण काम पूर्ण होऊन तयार आहे. परंतु त्यामध्ये केवळ एकच बाब अडचणीची आणि अडसर ठरली, ती म्हणजे बीड नगरपालिकेकडे महावितरण विभागाची एकूण ४१ कोटी ७५ लाख रूपयांची वीजबिल ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी येथे महाशिवरात्र उत्साहात साजरी होणार

**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक श्री. वैजिनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये भगवान श्री शंकराला महारुद्र अभिषेक सकाळी होणार आहे. तसेच संगीत भजनाचे आयोजन



करण्यात आलेले आहे. या संगीत भजनामध्ये संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची हजेरी राहणार आहे. याबरोबरच या महाशिवरात्रीच्या पूर्व काळानिमित्ताने महारुद्र अभिषेक, आणि महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आहे. तरी या सर्व कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे संस्थांचे दत्त उपासक श्री. वैजनाथ महाराज शिंदे यांनी कळवले आहे.

## भारतीय संविधानाची प्रत भेट देत सामाजिक उपक्रमासह गवळी परिवार व प्रभाळे परिवाराचा विवाह सोहळा

**वडवणी । प्रतिनिधी**

दि.२३/०२/२०२५ रविवार रोजी वडवणी तालुक्यातील आदर्शाकडे वाटचाल करणाऱ्या देवगाव नगरीमध्ये गवळी परिवार व प्रभाळे परिवार वधू चि. सौ.का. कोमल वर आनंत यांच्या विवाह सोहळ्या निमित्त देवगाव येथील रहिवासी गवळी परिवारातील कन्या कोमल हिच्या विवाह सोहळ्यानिमित्त मूळ पत्रिका धारक महिला भगिनींना





भारतीय संविधानाची प्रत भेट म्हणून देत एक सामाजिक उपक्रमा सह हा विवाह सोहळा संपन्न करण्यात आला,भारतीय संविधानाची सन २०२४-२०२५ हे भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून देशभरात साजरे होत आहे, यामागील सरकारचा मुख्य हेतू हा आहे की भारतीय संविधान उद्देशिका मध्ये नमूद असल्याप्रमाणे भारतीय सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्यातील सर्व नागरिकास सामाजिक आर्थिक व राजनीतिक न्याय विचारा अभिव्यक्ती विश्वास श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता प्रत्येक नागरिकांमध्ये प्राप्त करून देण्याचा व त्यातील सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा तसेच राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन पूर्तता करणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा भारतीय संविधानाचा महत्त्वाचा उद्देश असल्याचे आपल्याला दिसून येते भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता व्हावी तसेच संविधानाची मूल्य भारतीय नागरिकापर्यंत पोहोचावी हा सरकारचा हेतू आहे. चालू वर्षात सरकारकडून भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी वर्षा निमित्त वेगवेगळे उपक्रम चालू आहेत त्यातीलच एक भाग म्हणून भारतीय संविधान व त्यांची मूल्य प्रत्येक

▶▶ उर्वरित पान २ वर

